ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-I June 2012

# आनंदघर ( लर्निंग होम ) शाळेचा व्यक्तीअभ्यास

**प्रा. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ**
**माईर्स, एम्. आय. टी. स्कूल ऑफ एज्युकेशन (एम्.एड्.),**
**कोथरूड, पुणे – 38.**

**सारांश :**

आनंदघर ( लर्निंग होम ) या शाळेचा व्यक्तीअभ्यास करण्यासाठी शाळेच्या वैशिष्टानुसार उद्दिष्ट निश्चित करण्यात आली. आनंदघरचा अभ्यास प्रशासकीय दृष्टीने, अध्ययन – अध्यापन प्रक्रियांव्दारे, सहशालेय उपक्रम, मूल्यामापन या घटकांव्दारे व इतर आवश्यक बाबींनुसार करण्यात आले.व्यक्तिअभ्यास संशोधन पध्दतीनुसार निरीक्षण,प्रश्नावली,मुलाखत सूची विकसित करून त्यांचे गुणात्मक विश्लेषण करून उद्दिष्टांची पुर्तता करणारी माहिती गोळा केली आहे.

आनंदघर या शाळेतील शिक्षणप्रणाली विद्यार्थीकेंद्रीत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करण्याची प्रचिती येथे येते.कुठलाही ताण न देता मुलांना 'हसणं खेळणं' या त्यांच्या सहजधर्मानुसार शिकण्याचं वातावरण पुरवलं जातं. कोणताही घंटा तास, गृहपाठ व परीक्षा नाही. इथे पालकचं शिक्षक असतात. मुलांच्या क्षमतेनुसार छोटे छोटे गट केले जातात. पाठयपुस्तक वापरली जात नाही. पर्यावरण, नागरिकत्व, मूल्य जपणूक या सा–यासह त्याचं व्यक्तिमत्व विकसित केले जाते. आत्मविश्वास, निर्णयक्षमता, वैज्ञानिक दृष्टिकोन अशा जीवनपयोगी क्षमता ही जोपासल्या जातील असं शिक्षण दिलं जात. शाळेला व शिक्षकांना 'ग्राममंगल' ही संस्था मार्गदर्शन करते.

**मुख्य सज्ञा : आनंदघर ( लर्निंग होम )**

**प्रस्तावना :**

कालामानानुसार समाजाच्या गरजा बदलत असतात.शिक्षणाकडून केल्या जाणा–या अपेक्षा, यामध्ये देखील बदल होत असतात. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शिक्षण प्रक्रिया अधिकाधिक सुलभ व गतिमान आणि आनंददायी व्हावी यासाठी शिक्षण क्षेत्रात सतत प्रयोग सुरू असतात, पुनर्रचना होत असते यातून मिळणा–या समृध्द अनुभवातून शिक्षण व्यवस्थेस आवश्यक बदल होत असतात.होमबर्ग यांच्या मते, 'व्यक्तिने स्वत: शिकणे हा शिक्षणाचा गाभा आहे.'

ग्राममंगल ही शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून आपला वेगळा परिचय निर्माण केलेली एक सामाजिक संस्था आहे. 1982 साली प्रसिध्द समाजकरणी पद्मश्री अनुताई वाघ व प्रा. रमेश पानसे यांनी दाभोन, ता. डहाणू, जि. ठाणे येथे स्थापन केली याच संस्थेमार्फत कोथरूड, पुणे येथे 'आनंदघर' ही शाळा चालविली जाते. आनंदघर शाळेत शाळा व घर या एकाच नाण्याच्या दोन बाजू समजून मुलांबरोबर घरानेही शिकते व्हावे, पालकांनी मुलांच्या शिक्षणात सहभागी व्हावे त्यातून शिक्षण प्रक्रिया प्रभावी होते.मुलं निरीक्षणातून, अनुभवातून खरं शिकत असतात.घरानेही शिकावं आणि शाळेने घर व्हावं या इच्छेतून ''आनंदघर'' हे शिक्षण घर ( Learning Home ) साकार झाले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. आनंदघर या शाळेचा प्रशासकिय दृष्टिने अभ्यास करणे.
2. आनंदघर या शाळेचा अध्ययन अध्यापन दृष्टीने अभ्यास करणे.
3. आनंदघर या शाळेच्या मूल्यमापन प्रक्रीयेचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

सदयस्थितीचे अचूक वर्णन करण्यासाठी, निव्वळ घटनांची यादी मिळविण्याऐवजी एखादया बाबतीत अधिक सखोल अंतर्दृष्टी निर्माण करणा–या घटनांमधील परस्पर संबंध शोध घेण्यासाठी आनंदघर या शाळेच्या अभ्यासासाठी व्यक्ती अभ्यास पध्दती ( Case Study Method ) उपयोग केला.

**न्यादर्श :** ग्राममंगल व्दारा संचलित आनंदघर ( लर्निंग होम ).

**माहिती संकलनाची साधने :**

निरिक्षण : अध्ययन – अध्यापन प्रकिया, सहशालेय उपक्रम, मूल्यमापन प्रकिया यासाठी तंत्र
प्रश्नावली : शिक्षक , पालक – शिक्षक
मुलाखत : समन्वयक , मुख्याध्यापक.

**संशोधनाची कार्यपद्धती :**

प्रस्तुत संशोधनाामध्ये आनंदघर शाळेचा चिकित्सक अभ्यास करताना शाळेची प्रशासकिय बाबी, अध्ययन – अध्यापन, सहशालेय उपक्रम, मूल्यमापन यांचा विस्तृत अभ्यास करण्यात आला. निरीक्षण व

प्रत्यक्ष नोंदी या साधनाचा अधिक उपयोग झाला. अध्ययन – अध्यापनात व सहशालेय उपक्रम असताना प्रत्यक्ष उपस्थित राहून निरिक्षणे केली व नोंदी ठेवल्या.

मुलाखतीच्या माध्यमातून शाळा समन्वयकांशी चर्चा केली. त्यामधून शाळेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्रवेश पध्दती, अध्यापन पध्दती, शैक्षणिक साहित्य व साधने, वैयक्तिक मार्गदर्शन यासारख्या घटकांची माहिती मिळाली. प्रश्नावली व्दारे शिक्षकांची वैयक्तिक माहिती, विद्यार्थी आणि वर्गासंबंधी, शाळेसंबंधीची माहिती, अभ्यासांतर्गत कामाचे आयोजन, शाळेची वैशिष्टये, अध्यापन पध्दती यासंबंधीत मिश्र प्रश्नावली भरून घेतल्या. यामध्ये 15 पूर्णवेळ शिक्षक व 8 पालक – शिक्षक यांनी प्रश्नावली भरून दिली. शाळेतील विद्यार्थ्यांशी वेळोवेळी चर्चा करून मिळालेल्या माहिती सखोल व विश्वसनीय असल्याची खात्री करून घेतली.

**निष्कर्ष :**

1. आनंदघर या शाळेचा संपूर्ण प्रशासकिय कारभार हा ग्राममंगल या संस्थेमार्फत चालविण्यात येतो. ही शाळा प्राथमिक व माध्यमिक स्तराची आहे. शासनीची मान्यता नाही. शिक्षकांची निवड त्यांच्या शिकविण्याच्या क्षमता पाहून केली जाते.
2. आनंदघर या शाळेत जीवनामुख शिक्षणप्रक्रिया राबविली जाते. स्वयं अध्ययन प्रक्रियेवर जास्त भर दिला जातो. भाषिक कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना मेंदू आधारित शिक्षण दिले जाते. कलागुणांचा विकास होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. अध्ययन साहित्य व उपक्रम शाळेमार्फत पुरविण्यात येते. शाळेमध्ये सुयोग्य वातावरण आहे.
3. विद्यार्थ्यांची कुठलीही परीक्षा घेतली जात नाही. क्षमताधिष्ठित मूल्यमापन प्रक्रियेचा उपयोग केला जातो. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीव्दारे मूल्यमापन करण्यात येते. विविध उपक्रम देवून, त्यांची पूर्तता विद्यार्थी कशाप्रकारे करतो त्यावरून मूल्यमापन केले जाते.

प्रत्येक बालकाला उपजत शिकण्याची आवड असते. प्रत्येकाचाच मेंदू हा त्याचा शिकण्याचा अवयव आहे. शाळांतन कृतिशील अनुभवांची रेलचेल असेल तर प्रत्येकच मूल शाळेत जावून चांगले 'शिकते' होईल.

स्वयंशिक्षणाच्या अपार संधी, सौंदर्यपूर्ण आनंदमय वातावरण, व्यक्तिगत शिक्षणाची रचना, बौध्दिक आव्हाने घेण्याची संधी, आवडीचे – निवडीचे स्वातंत्र, व्यक्तिमत्त्वाचा आदर, भावनांची कदर या गोष्टी असतील तर श्वासोच्छवासाइतक्या सहजपणे, सरसतेने मुले शिकत जातात. जिथे बक्षिसांची लालूच

नाही, शिक्षाचे भय नाही. परीक्षाचे नि स्पर्धाचे वृथा ताण नाहीत. शिस्तीचा बडेजाव नाही. जिथे नवनवोन्मेषशाली कल्पनांचे पतंग आकाशात उडवायला मिळतात. जिथे विचारांच्या खोल सागरात मनसोक्त पोहायला मिळते. जिथे मुले नवनवे ज्ञान अधाशासारखे आत्मसात करतात. अशी विविधांगी संधी पुरविते ती शाळा, अशी शाळेची व्याख्या करता येईल. या सर्व गोष्टी आनंदघरच्या अभ्यासत दिसल्या.

**संदर्भ :**

1. गोर्ले शिवराज, ( 1 सप्टेंबर 2011 ). मुलांना फुलूं दया, सकाळ (सप्तरंग).पृष्ठ क.2
2. ग्राममंगल व्दारा प्रकाशित माहितीपुस्तिका.
3. http//: www.grammangal.org